डिस्ट्रिक्ट ३१३१
क्लब नं.८६३९९

# रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेज

RI President: Holger Knaack

# संस्कृती

संपादक : रो. सुचित्रा शिंत्रे
सहकारी : रो. सोनाली वैशंपायन, रो. श्रीकांत कानेटकर, रो. मोहन चौबळ

प्रांतपाल २०२०-२१
रो. रश्मी कुलकर्णी
अध्यक्ष: रो. विनय नेवसे
सचिव: रो. विवेक जोशी
अंक ४ था , ऑक्टोबर २०२०

## अध्यक्षीय...

### 'महादान'

**।। हस्तस्य भूषणम् दानं ।।**

हाताचे खरे भूषण आहे दान, दुसऱ्याला ज्या गोष्टीची गरज आहे तेच देणे म्हणजे दान आणि तेच सत्कर्म.



आपल्या भारतीय संस्कृतीत दानाला खूप महत्व आहे. त्यातून अधिक महिन्यातील दानाला तर जास्त महत्व आहे. दान देताना घेणाऱ्याची खरी गरज देखील ओळखता येणे खूप गरजेचे असते. एखाद्या तहानेने व्याकुळ झालेल्या व्यक्तीला आपण पंचपक्वान्नाचे ताट दिले वा एखाद्या भुकेल्या व्यक्तीला आपण ज्ञानदान करत बसलो तर त्याचा उपयोग शून्य.

एकदा ऋषी वसिष्ठांना तहान लागली होती. त्यावेळी रतीदेवांनी त्यांना थंड पाणी दिले. त्याबद्दल वसिष्ठांनी प्रसन्न होऊन रतिदेवांना वर देऊन स्वर्गात स्थान दिले. दान हे फार मोठे, किमती मौल्यवान अशा स्वरूपाचे करावे असे नाही, तर ते गरजूंना जे हवे ते देण्यातून दानाचे पुण्य प्राप्त होऊ शकते. तप्त उन्हात सावली देणारं झाड पांथस्थाला उन्हाच्या तीव्रते पासून सावली देऊन तेच करतं, कारण त्याची त्यावेळची गरज तीच असते. स्नानाने तनाची शुद्धी होते, धनाने मनाची शुद्धी होते तर दानाने धनाची शुद्धी होते. यथार्थ दान तेच असते ज्या दानाने देणारा व घेणारा या दोघांनाही सुख व समाधान लाभते.

संत कबीर म्हणतात,

***घन रहे ना जौबन रहे, रहे छाँव ना धाम।***
***कबीर जगमें जस रहे, कर दे किसिका काम।***

ह्या नश्वर जगात काहीच टिकून राहत नाही. ना तारुण्य, ना आपलं शरीर, ना आपली मालमत्ता. शाश्वत फक्त एकच- ते म्हणजे आपला दुसऱ्याला उपयोग म्हणजेच दानाचे पुण्यकर्म.

महाभारतातील कर्ण त्याच्या दानशूरतेसाठी प्रसिद्ध होता, अगदी मरणाच्या दारात उभा असताना देखील एक ब्राम्हण त्याच्याकडे याचक म्हणून आला, त्याला द्यायला कर्णाजवळ काहीच नव्हते. पण त्याला तसाच परत कसा पाठवायचा म्हणून कर्णाने त्याला स्वतःच्या तोंडात असलेला सोन्याचा दात काढून दिला.

स्वतःसाठी मागितली जाते ती भीक, कुटुंबासाठी मागितली जाते ती भिक्षा, आणि दुसऱ्यासाठी मागितले जाते ते दान.

आमचा रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेज देखील हीच दानाची महती ओळखून गेली पाच वर्षे 'महादान' हा प्रकल्प राबवत आहे. ह्यात धान्यदान, वस्त्रदान, रक्तदान, रोख रक्कम दान अशी विविध दाने स्वीकारली जातात. दरवर्षी आम्ही जुलै महिन्यात हा प्रोजेक्ट करतो परंतु, ह्या वर्षी कोरोनामुळे जुलै ऐवजी अधिक महिन्यात आपण हा प्रोजेक्ट करत आहोत. दरवर्षी आपण आमच्याकडे येऊन आम्हाला हे दान देता. पण ह्यावर्षी आम्ही तुमच्याकडे येऊ. आम्ही आपणांस आव्हान करत आहोत, आपण रहात असलेल्या सोसायटीत, मित्रमंडळीमध्ये, नातेवाईकांना सांगून ज्याला जसे शक्य होईल, म्हणजेच यथाशक्ती जे दान देऊ इच्छिता ते आम्ही ह्या अधिक महिन्यात आपणाकडे येऊन घेऊन जाऊ. १८ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर ह्या कालावधीत आपण हे सर्व एकत्र जमवून आम्हाला फोन केलात तर आम्ही आपणाकडून हे दान स्वीकारण्यासाठी नक्की येऊ. अर्थात मास्क, सॅनिटायझेशन, सोशल डिस्टनसिंगचे सर्व नियम पाळूनच.

मित्रांनो आपण देणार असलेले सर्व धान्य व कपडे, रक्कम ही खऱ्या गरजूंपर्यंत पोहचवण्याची जबाबदारी आमची. कोरोना ह्या वैश्विक महामारीमुळे खूपशा संस्थांचा मदतीचा ओघ थांबला आहे. आज आपल्या मदतीची खरी गरज ह्या संस्थांना आहे. तेंव्हा कमीतकमी एक किलो धान्य, आपले सुस्थितीत असलेले स्वच्छ जुने कपडे, रोख रक्कम असे दान आम्हास द्या, शक्यतो आपण राहत असलेल्या सोसायटीत एक दिवस ठरवून हे गोळा करून ठेवा. आम्ही आपल्या सोसायटीत येऊ व घेऊन जाऊ. तेंव्हा आम्हास सोबत दिलेल्या नंबरवर नक्की फोन करा.

**धन्यवाद!!**

**–रो. विनय नेवसे**

रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेज
अधिक मासानिमित्त
**महादान**



# संपादकीय...

### हे रोटरी करते -

मार्च महिन्यापासून कोरोना सारख्या महामारीमुळे, सगळं जगंच ठप्प झाल्यासारखे झाले आहे. सगळीकडे अस्वस्थता, अशांतता, असुरक्षितता, याचे वातावरण आहे.



या अशा परिस्थितीत सगळ्यात वाईट परिणाम कोणावर झाला असेल तर तो म्हणजे, सामाजिक काम करणाऱ्या संस्था. समाजातील दुर्बल घटकांसाठी काम करणाऱ्या या संस्था, या आता स्वत:च दुर्बलतेच्या शिकार झाल्या आहेत. समाजातून येणारा, मदतीचा, आर्थिक सहाय्यतेचा त्यांचा ओघ हा आटत चालला आहे. रोजचा उदरनिर्वाह चालवणे पण अत्यंत अवघड होऊ लागलेलं आहे.

परंतू अशा, संकटग्रस्त, अवघड परिस्थितीच रोटरी सारख्या जगभरातील संस्थांचा कस पणाला लागतो, आणि मग रोटरी - जागरूक होऊन आपले कार्य सुरू करते. अशा वेळेला आमचा रोटरी क्लब पुणे हेरिटेज तरी मागे कसा राहील.

याही काळात क्लबने, घरातच अडकून राहिलेल्या मुलांसाठी, स्तोत्रपठण, चित्रकला, गायन, गणपती बनविणे अशा अनेक स्पर्धा घेतल्या. शिक्षकांसाठी **Digital Guru Mantra** माध्यमातून डिजीटल स्कीलचे वर्ग घेतले. परंतू येवढचं करून क्लब थांबला नाही, तर अनेक भुकेल्यांच्या पोटी अन्नाचे दोन घास कसे जातील याचीही व्यवस्था केली 'महादान' या प्रकल्पातून. अन्न, वस्त्र, निवारा या आपल्या मुलभूत गरजा. यातील अन्न आणि वस्त्र या गोष्टींची व्यवस्था आपला क्लब करतोय.

रोस्ट्रम, ध्रुव, स्नेहालय, मातोश्री वृद्धाश्रम, जनकल्याण समिती या सामाजिक संस्थांकडे क्लबने मदतीचा ओघ सुरू केला आहे. - मला वाटतं हिच सामाजिक जाण असणं महत्त्वाचं. रोटरी हे तळागाळातील लोकांसाठी विशेषत: करते आणि म्हणूनच मला रोटरीचा अभिमान वाटतो.

**- रो. सुचित्रा शिंत्रे**

# 'क्लब'ची लिटरसी




आजचा कमला मसंद टेक्निकल इन्स्टिट्यूट फोर ब्लाइंड स्टुडंट्स मध्ये zoom Webinar वर Rtn.विजयाचे Stress management वर अतिशय सुंदर व्याख्यान झाले.

या कार्यक्रमाची काही खास वैशिष्ट्य म्हणजे...१.७५ हून अधिक विद्यार्थी, शिक्षक व ट्रेनर्स यांची उपस्थिती होती.

२. ही webinar फक्त पुण्या पुरती मर्यादित नव्हती व भारतातल्या बऱ्याच प्रदेशातून विद्यार्थी जॉईन झाले होते.

३.अंध विद्यार्थ्यांसाठी अशाप्रकारे online webinar वर संवाद साधणे... मला वाटतं zoom चा देखील कदाचित पहिलाच प्रयोग असेल.

विजयाबद्दल काय सांगावं...Stress management म्हणजे समजायला कठीण... पण फक्त एका तासाच्या छोट्या अवधीत अतिशय समर्पक मुद्देसूद, सोप्या शब्दात हा विषय इतका छान समजून सांगितला व सगळ्यांची मनं जिंकली.



Hats off to you Vijaya !

अजून एक सांगितल्याशिवाय राहवत नाही.

आपण किती छोट्या छोट्या गोष्टींसाठी अस्वस्थ होतो, नाराज होतो अगदी stress करून घेतो.

या डोळ्याने अंध पण मनाने अतिशय डोळस असणा?या गुणी विद्यार्थ्यांचा उत्साह, त्यांचा सहभाग, प्रश्नांचा भडीमार आणि आपल्याला हव असलेल मार्गदर्शन मिळाल्याचा आनंद...

खरंतर आपण ज्यांनी कुणी ही webinar join केली त्यांना हा आनंद नक्कीच बघायला मिळाला असेल.

ज्यांना कोणाला करता आली नाही त्यांच्यासाठी इन्स्टिट्यूटने रेकॉर्डिंग केलेल्या काही clips पाठवत आहे. आपण याचा जरूर आनंद घ्यावा.

आणि हो. इन्स्टिट्यूटचे मॅनेजर श्री मंगेश कुलकर्णी यांनी आपल्या सर्वांना इन्स्टिट्यूटमध्ये बोलावले आहे. आपणही या इन्स्टिट्यूटला नक्कीच भेट द्यावी. अर्थात सर्व काही सुरळीत झाल्यावर...वोकेशनल कमिटी..

आज माझा नेमका फोन बंद झाल्याने हे सगळ कळविण्यात

**–रो. संजय महाजन**

# ‘गोष्ट एका बोलण्याची’

चार वर्षानंतर बदली झाल्यामुळे मोहन पुन्हा आपल्या जुन्या घरी रहायला आला, चाळीसारख्या इमारतीमध्ये वडिलोपार्जित दोन खोल्यांचे घर होते, किरकोळ बदल सोडले सगळी परिस्थिती पूर्वी होती तशीच, फक्त एक मोठा बदल झाला तो मोहनला जाणवला. शेजारी राहणाऱ्या माई आणि अण्णा यांच्या घरात पूर्वी कायमच बोलण्याचा नाहीतर रेडिओचा आवाज येत असे, आताही बोलण्याचा आवाज येत होता पण फक्त एकट्या अण्णाचाच. एकदाही मोहनने माईंचा आवाज ऐकला नव्हता. मोहनच्या शेजारीच राहणारे जोडपे माई आणि अण्णा. घरात दोघेच, मूलबाळ नाही,पेन्शनवर घर चाललेले,अण्णा मुळातच अबोल, कमी बोलणारे, फक्त विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देणे हा त्यांचा स्वभाव. फारसे मित्र नाही, सतत आपले पेपर, पुस्तक किंवा काहीतरी वाचत बसणे हाच त्यांचा आवडता छंद. याउलट माई म्हणजे उत्साहाचा झरा, सतत बडबड, कायम कुणा ना कुणाशी तरी बोलताना दिसायच्याच, बोलण्याची आणि गप्पा मारण्याची प्रचंड आवड.



अण्णा म्हणजे बोलता येते की नाही अशी शंका यावी इतके कमी बोलणारे आणि दुसरीकडे माई, नको इतके बोलणाऱ्या असा हा लक्ष्मी-नारायणाचा जोडा. दोघांचे बिल्डींगमध्ये राहणाऱ्या प्रत्येकाशीच आपुलकीचे, जिव्हाळ्याचे संबंध अर्थात त्याला कारण माईच.

पूर्वीपासूनच शेजारून येणाऱ्या सततच्या आवाजाचा मोहनला खूप राग यायचा. आताही तेच झाले होते. तो चिडला.

‘कसला वैताग आहे, जरा शांतता नाही, या घरात एकतर रेडिओ किवां हे चालूच असतात, थोडावेळ तरी गप्प राहता येत नाही का यांना,आज सांगतोच त्यांना की कधीतरी गप्प बसत जा,’

मोहनचा राग अनावर झाला होता पण बायकोने त्याला आवरले.

मोहनला राहून राहून एका गोष्टीचे आश्चर्य वाटत होते ते म्हणजे आल्यापासून त्याने माईंचा आवाज एकदाही ऐकला नव्हता. दारावरची बेल वाजली. अण्णा होते, मोहनकडे फ्रीजमध्ये ठेवलेले दुध न्यायला आले होते. ‘दुध’ एवढेच ते बोलले आणि दुधाची पिशवी घेऊन निघाले. तेव्हा मोहनने आग्रह करून त्यांना थांबविले,

‘आण्णा, आज आमच्याकडे चहा घ्या’- मोहन

‘नको, कशाला उगीच’- अण्णा

‘चहाला नाही म्हणायचे नसते’

‘अमृत म्हणून ना’ असं म्हणून अण्णा हसले आणि ‘आलोच’ म्हणून एकदा आपल्या घरात डोकावून आले,

माई झोपल्या होत्या म्हणून अण्णा थोडे निवांत झाले. मोहन आणि त्याच्या बायकोसोबत गप्पात रंगून गेले. पण मोहनची माई विषयीची उत्सुकता शांत बसू देत नव्हती, सतत बोलण्याच्या आवाजबद्दल, माईंच्या न बोलण्याविषयी त्याने अण्णांना विचारलेच. एकदम अण्णा गंभीर झाले. खिडकीतून बाहेर बघू लागले. लगेच उठले आणि चहाचा कप हातात घेऊन पुन्हा एकदा आपल्या घरामध्ये डोकावून आले. मोहन आणि त्याच्या बायकोने एकमेकांकडे बघितले, दोघांनाही जाणवले की अण्णांना खूप काही सांगायचे आहे, त्यानंतरचे काही क्षण शांततेत गेले. चहाचे दोन घोट घेतल्यानंतर अण्णा म्हणाले, ‘मोहन,लहानपणापासून तू माईंना कायम बोलताना पाहिलं आहेस, तुला तर माहिती आहेच कि माईला सतत बोलायची सवय. तिचे ऐकण्यातच आयुष्याची गेली ३७ वर्षे गेली,आमचे लग्न होऊन ३९ वर्षे झाली. मुळातच मी कमी बोलणारा तर ती नको वाटावे इतकं बोलणारी. सरकारी नोकरी,स्वतःचे घर आयुष्य सुखात चाललेलं, एकाच मोठी खंत पदरी मुलबाळ नाही,कोणाचे पालक नाही होता आले,अनेक प्रयत्न केले पण यश मिळाले नाही तेव्हा नाद सोडला, यागोष्टीचा खूप त्रास झाला. आपल्या बोलक्या स्वभावाने माई बिल्डींगमधील कुणाची काकू, कुणासाठी फक्त माई, अनेकांची माई आजी झाली. आपल्या मातृत्वाची हौस पुरेपूर तिने भागवून घेतली, सतत दुसऱ्यांना मदत करणे आणि गप्पा मारणे, गरज पडली तर इतरांची भांडणे सोडविणे हाच माईंचा दिनक्रम झाला होता..’

एवढं बोलून अण्णा उठले आणि पुन्हा एकदा आपल्या घरात डोकावून आले, माई अजूनही झोपलेल्या होत्या. अण्णा खुर्चीत बसून बोलू लागले,

‘माफ करा, आमची कर्मकहाणी सांगण्यात तुमचा वेळ घेतो आहे’

‘नाही,असं काहीही वाटून घेऊ नका, तुम्ही बोला’ मोहनची बायको म्हणाली.

‘आमचं म्हातारपण आम्ही छान एन्जॉय करीत होतो अगदी गेल्या दोन वर्षापर्यंत.’ एवढं बोलून ते एकदम थांबले त्यांचे डोळे भरून आले, मोठ्या मुश्किलीने त्यांनी आलेला हुंदका आवरला. मोहन आणि त्याची बायको एकदम गांगरून गेले, तिने पाण्याचा ग्लास दिला,मोहन आण्णांच्या जवळ जाऊन बसला.

‘ठीक आहात तुम्ही’

‘हो, माफ करा एकदम भरून आले’

‘काय झालं अण्णा,मन मोकळ करा,आम्ही तुमच्या मुलांसारखेच आहोत.’

‘अरे, काय सांगू दोन वर्षापूर्वी माईला घशाचा त्रास सुरु झाला, सुरवातीला घरगुती उपचार केले पण त्रास वाढतच गेला, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार तपासण्या केल्या. त्यात एका असाध्य आजाराचे निदान झाले. मग काय औषधे, अजून तपासण्या, पथ्ये आणि प्रचंड खर्च यात सहा महिने गेले, हळूहळू माईचे बोलणे कमी कमी होत गेले, तिचे सतत हसतमुख राहून प्रत्येकाशी आपुलकीने, लाघवी बोलणेच तिची ओळख होती, आणि तीच ओळख .......... आता तर ती एक शब्द सुद्धा बोलू शकत नाही, एखादा अत्यंत मनमोहक मोठा धबधबा आटत जाऊन नाहीसा व्हावा तसे माईंच्या बाबतीत झाले.’

यावेळी डोळ्यातून येणारे पाणी अण्णा रोखू शकले नाहीत. स्वतःला त्यांनी सावरले पुढे सांगू लागले,

‘आजाराच्या निदानानंतर काही दिवस असेच भयाण शांततेत गेले, नंतर मलाच समजले की ‘बोलणे’ तिचे बंद होणार आहे आपले नाही, मग मी प्रयत्नपूर्वक आपल्या सवयी बदलल्या, थोडा त्रास झाला पण हळूहळू जमले. मी उत्तमरित्या तिच्याशी गप्पा मारू

(उर्वरित लेख, पुढील पेज ४ वर)

## रोटरीबद्दल...

# 'रोटेरीयन' असल्याचा मला अभिमान आहे

**- रो. मोहन चौंबळ**

काही महिन्यांपूर्वी कोकणात चक्रीवादळ आले, तेव्हा कर्जत जवळील एक छोटेसे गाव पूर्णपणे उध्वस्त झाले. तिथे राहणारी ९० आदिवासी कुटुंबे अक्षरशः काही तासांत उघडयावर आली. रामदास हा या गावचा एक रहिवासी आणि एका रोटरी क्लबचा माजी अध्यक्ष. रामदासकडून या घटनेची माहिती कळताच त्याच्या वर्षीचे सर्व क्लब प्रेसिडेंट एकत्र आले, लाखो रुपये निधी जमा केला, बांधकाम साहित्य पुरवले आणि काही दिवसातच सर्व घरांची दुरुस्ती केली. आठवडाभर गावकऱ्यांच्या जेवणाची व्यवस्थाही केली.



आश्चर्यकारक वाटते, परंतु आम्हा रोटेरियन्सना अशा घटनांची आता जणू सवयच झाली आहे. खरोखर, जगभरातील १२ लाख रोटेरीयन मित्र रोटरीमध्ये सामील होणाऱ्या प्रत्येक नवीन सदस्याला आपसूकच मिळतात. असे मित्र जे कठीण परिस्थितीत मदत करण्यासाठी नेहमीच तयार असतात. जेव्हा कोणाला नैसर्गिक आपत्ती, प्रवासादरम्यान एखादी अनपेक्षित अडचण, आरोग्याची गंभीर समस्या यासारख्या आपत्कालीन परिस्थितीचा सामना करावा लागतो, तेव्हा रोटेरीयन सहकाऱ्यांनी मदत केल्याची असंख्य उदाहरणे आहेत

आज जगभरात दोनशेहून अधिक देशांत रोटरी कार्यरत आहे. केवळ या विस्तारामुळेच अनेक अशक्यप्राय कार्ये रोटरी पूर्ण करू शकली, मग ते जगातील कोट्यावधी निरक्षर लोकांना साक्षर बनवणे असो, पोलिओसारख्या भयानक रोगाचा नायनाट करण्यासाठीच्या मोहीमेची सुरवात असो, वा संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना करण्यासाठी पुढाकार असो.

दुसऱ्या महायुध्दादरम्यान आंतरराष्ट्रीय शांतता वाढवण्यासाठी रोटरीने पुढाकार घेऊन जगभरातील रोटेरीयन्सना संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना व जागतिक शांततेचे महत्त्व याविषयी जागरूक केले. १९४२ मध्ये महायुध्द चालू असतानाच युद्धाच्या समाप्तीनंतर शैक्षणिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाण करणारी संघटना स्थापन करण्याच्या उद्देशाने रोटरीने लंडनमध्ये एक परिषद आयोजित केली. २१ देशांचे शिक्षणमंत्री व सरकारी प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले होते. या गटाने युनेस्कोच्या (संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संस्था) स्थापनेसाठी काम करण्यास सुरवात केली. यातूनच पुढे संयुक्त राष्ट्र संघटनेचा जन्म झाल

दारिद्र निर्मूलन, आरोग्य सुधारणा व शिक्षण याद्वारे जागतिक शांतता वाढविण्यासाठी गेली ११५ वर्षे रोटरी कार्यरत आहे. रोटरी फाउंडेशन जगभरातील प्रोजेक्ट्सवर दरवर्षी एक हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम खर्च करते, तसेच पोलिओ निर्मुलनासाठीही साधारणपणे तेवढीच रक्कम खर्च करते.

फाउंडेशनला मिळणाऱ्या डोनेशन्समधील ९६.५०% रक्कम प्रोजेक्ट्सवर खर्च केली जाते. याचाच अर्थ संस्थेचे कामकाज चालवण्यासाठी इतर स्वयंसेवी संस्थांच्या तुलनेत फारच कमी रक्कम रोटरी वापरते. संस्थेच्या कामकाजामधील पारदर्शकता आणि निधी वापरातील कार्यक्षमता यामुळे रोटरी फाऊंडेशनला चॅरिटी नेव्हिगेटरद्वारे सर्वोच्च फोर स्टार रेटिंग गेली अनेक वर्ष मिळत आहे.

याशिवाय स्थानिक पातळीवर प्रत्येक रोटरी क्लब स्वतःची प्रोजेक्ट्स करत असतो, त्यासाठी स्वतःचा निधी उभा करत असतो. साक्षरता व व्यावसायिक कौशल्यांपासून आरोग्य आणि पर्यावरण रक्षणापर्यंत, रोटरीचे कार्य अखंड चालू आहे. गेल्या काही वर्षात सुमारे पाच कोटी भारतीयांचे जीवनमान रोटरी क्लब्सच्या प्रोजेक्ट्समुळे उंचावले आहे.

एक रोटरियन असल्याचा मला खरोखरच अभिमान आहे!

*(उर्वरित लेख पेज ३ वरून) गोष्ट एका बोलण्याची .....*

लागलो, माझ्यामध्ये झालेला हा बदल माईला खूप खूप सुखाऊन गेला. माझ्या सतत बोलण्यामुळे तिच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद पाहून खूप समाधान मिळत होते. म्हणून तर शक्य होईल तेवढा वेळ मी तिच्या बरोबर बोलत राहतो, मला पूर्णपणे जाणीव आहे की या सततच्या बोलण्याचा शेजारच्यांना, तुम्हाला त्रास होतो त्याबद्दल मनापासून माफी मागतो'. असे म्हणून अण्णांनी उभे राहत हात जोडले. सतत बोलण्याची वेगळी बाजू ऐकून मोहन आणि त्याची बायको सुन्न झाले, मोहन अण्णांचे हात हातात घेऊन म्हणाला,

'अजिबात त्रास होत नाही, एक विचारतो आम्ही माईंबरोबर बोलायला आले तर चालेल?'

'पळेल, अरे तिला बरं वाटाव म्हणून तर मी बोलत असतो तेवढाच विरंगुळा. पुढचं भविष्य ठरलेलच आहे, म्हणूनच तर तिच्या बडबडण्याच्या सवयी मी लाऊन घेतल्या आहेत, एरवी फारसा न बोलणारा मी तिच्या आजारपणामुळे बोलका झालो आहे 'वाईटामधून चांगले निघते ते हेच' असे माईनेच मला सांगितले.

तेवढ्यात अण्णांचा मोबाईल वाजला आणि लगेच बंद झाला 'उठल्या माईसाहेब, मिस कॉल ही घरी येण्याची ऑर्डर आहे, चल निघतो' असे म्हणत अण्णा आपल्या घरी गेले.

मोहन आणि त्याची बायको 'काय बोलावे' याचा विचार करत होते .

**-मंगेश मधुकर**

## आपला वारसा

# पुण्यातील जोगेश्वरी

श्रावण महिना आला कि सगळीकडे उत्सवांची लगबग सुरु होते. एका पाठोपाठ एक सणांची जणू रांगच लागलेली असते. गणपती उत्सव हा पुण्यात सर्वात मोठ्या प्रमाणात साजरा होणारा उत्सव म्हटल्यास गैर ठरू नये. दिवाळी सुद्धा जितकी मोठ्या प्रमाणात साजरी होत नाही, तेवढा मोठा गणेशोत्सव पुण्यात होतो. गणेशोत्सव झाला कि सर्वांना वेध लागतात ते नवरात्रीचे. गणपती प्रमाणेच १० दिवस चालणारा हा अजून एक मोठा सण. गेल्या काही वर्षात सार्वजनिक नवरात्र उत्सव साजरा करण्याचे पुण्यातले प्रमाणही खूप वाढले आहे. माझ्या लहानपणी जोगेश्वरीचे दर्शन किंवा चतु:श्रृंगी देवीच्या जत्रेला जाणे इथपर्यंतच नवरात्रीचे सार्वजनिक स्वरूप होते. पण आता गणपती प्रमाणे ठिकठिकाणी चौकामध्ये मांडव घालून १० दिवस नवरात्र साजरी केले जाते. पुण्यातल्या प्रसिद्ध देवीच्या मंदिरांची नावे विचारली तर चतु:श्रृंगी, पद्मावती देवी, भवानीमाता मंदिर, महालक्ष्मी मंदिर, जोगेश्वरी अशी अनेक नवे आपण घेऊ.. पण गणपती उत्सवात जो मान कसबा गणपतीला आहे, तसाच मान नवरात्री मध्ये तांबडी जोगेश्वरीला. कसबा गणपती प्रमाणेच हे सुद्धा पुण्याचे एक ग्राम दैवत. लग्न झाल्यावर किंवा कोणतेही शुभ कार्य करण्यापूर्वी जसे आपण कसबा गणपतीच्या दर्शनाला जातो, तसे जोगेश्वरीला सुद्धा जातो. जोगेश्वरी नाव घेतलं कि आपल्या समोर येते ती बुधवार पेठेतली अप्पा बळवंत चौका जवळची तांबडी जोगेश्वरी. पण आपल्याला हे माहित आहे का, कि पुण्यात अजून २ जोगेश्वरी आहेत. पिवळी जोगेश्वरी आणि काळी जोगेश्वरी. ह्या लेखात त्यांच्या बद्दल थोडी माहिती घेऊया.



तांबडी जोगेश्वरी हे पुण्यातल्या सर्वात जुन्या मंदिरापैकी एक. त्रिंबक बेंद्रे यांनी सन १५४५च्या सुमारास एका स्वयंभू मुर्ती भोवती एक छोटे मंदिर बांधले होते असे म्हंटले जाते. त्याकाळी पुणे म्हणजे एक छोटी वस्ती होती. आंबील ओढ्या किनारी गावाच्या वेशीवर असलेले एक छोटे मंदिर अशीच याची ओळख. नंतर १६३६ मध्ये जेव्हा शिवाजी महाराज पुण्यात आले, तेव्हा जिजामाता आणि दादोजी कोंडदेव यांनी जोगेश्वरीचा आशीर्वाद घेऊन पुण्यात सोन्याचा नांगर फिरवला. हळू हळू मंदिराच्या आसपास मग कायापालट सुरु झाला. पुढे पेशवे काळात जेव्हा पुणे हे एक मोठे नगर म्हणून अस्तित्वात आले, तेव्हा सन १७०५ मध्ये पेशव्यांनी मंदिरास मोठी जमीन दिली आणि आज जे मंदिर आहे त्याची स्थापना





झाली. पेशवे त्यांच्या मोहिमे वेळीस जोगेश्वरीचा आशीर्वाद घेऊनच पुढे जात असत अशी नोंद दिसते. दसऱ्याच्या दिवशी पेशवे आणि त्यांचे मोठे मोठे सरदार देवीची पूजा करत आणि मग पालखीमधून देवीची मिरवणूक निघत असे. जी प्रथा अजूनही चालू आहे.

आत्ता असलेले मंदिर हे दोन भागात बांधले आहे. गर्भगृह आणि मंडप. गर्भगृह किंवा गाभाऱ्यामध्ये देवीची स्वयंभू मुर्ती विराजमान आहे. गाभारा हा पायाला चौकोनी तर छताकडे अष्टकोनी आहे. त्यावरती वर्तुळाकार कळस बांधला आहे. मंडपाचे बांधकाम हे पूर्णपणे दगडी आहे. त्यावर सुद्धा एक छोटा कळस बांधला आहे. मंडपामध्ये विठ्ठल रखुमाई आणि गणपतीच्या छोटे खाणी मुर्त्या आहेत. मंडपाच्या प्रारंभी सिंहाची मुर्ती आहे. सिंह हे देवीचे वाहन समजले जाते. मंदिराची रचना ही देवी पंचायतन पद्धतीनुसार केली आहे. ज्यामध्ये मध्यभागी देवीचे मंदिर आहे, चार बाजूला विष्णू, शंकर, आणि गणपती यांची छोटी मंदिरे आहेत. मंदिरा समोर २ दीपमाला होत्या, पण रस्त्याच्या कामामध्ये त्यातील १ नष्ट झाली आहे आणि १ मंदिरासमोर रस्त्यापलीकडे आहे.

काळी जोगेश्वरीचे मंदिर सुद्धा बुधवार पेठेत आहे. शिवाजी रस्त्याने स्वारगेटकडे जाताना काका हलवाई दत्त मंदिरासमोर डाव्या हाताला हे छोटेसे मंदिर आहे. पहिल्यापासूनच ह्याचे नाव काळी जोगेश्वरी असल्याचे आढळते. कदाचित काळ्या पाषाणातील मुर्ती असल्यामुळे मंदिराचे नाव काळी जोगेश्वरी असे पडले असावे. ही मूर्ती अडीच ते तीन फूट उंच, बसलेली आहे. मूर्तीला चार हात असून चेहऱ्यावरील भाव प्रसन्न आहेत. हातामध्ये चक्र, पद्म, शंख ही आयुधे आहेत. चौथा हात अभयमुद्रेत आहे. मूर्तिकाराने नथ घालता यावी म्हणून मूर्तीचे नाक टोचलेले आहे. वैशिष्ट म्हणजे देवीला तीन नेत्र आहेत. तिसरा नेत्र उभा नसून आडवा आहे. ही मूर्ती १९५५ साली जयपूरहून घडवून आणली आहे. याआधी अशीच मूर्ती होती. परंतु, ती भंगल्याने नवीन मूर्तीची स्थापना करण्यात आली. गाभाऱ्यासमोर लाकडी सभामंडप आहे. येथे देवीसमोर गणपतीचे छोटे मंदिर आहे. हा गणपतीही दोनशे वर्षांपेक्षा जास्त जुना आहे. गणपतीच्या डाव्या बाजूस छोटी शिवलिंगे आहेत व उजव्या बाजूस कालभैरवाची छोटी मूर्ती आहे. येथे एकादशी, अष्टमी, पौर्णिमा, अमावस्या या दिवशी स्नानपूजा असते. इतर दिवशी पाद्यपूजा केली जाते. नवरात्रामध्ये उत्सव साजरा केला जातो. गेली काही दशके भिडे कुटुंबीय येथील व्यवस्था बघतात. हे मंदिर फारसे प्रसिद्ध नसल्याने नवरात्रीतही येथे निवांत दर्शन घेता येते.

शुक्रवार पेठेत फडगेट पोलीस चौकी करून पंचमुखी मारुती मंदिराकडे जाताना डाव्या हाताला पिवळी जोगेश्वरीचे मंदिर

(उर्वरित लेख, पुढील पेज ५ वर)

## रोटरीचे दर महिन्यातील उद्दिष्ट

# रोटरीचा खास महिना नोव्हेंबर, 'फाउन्डेशन'चा

रोटरी सेवेचा आत्मा, 'फाउन्डेशन'! १०० वर्षांपूर्वी २६.५ डॉलर्स जमा करून आर्च क्लम्फ यांनी 'द रोटरी फाउन्डेशन' (TRF) ची स्थापना केली. याची एक गमतीदार कहाणी आहे. १९१७ साली कन्व्हेन्शन संपल्यावर राहिलेली शिल्लक रक्कम २६.५ डॉलर्स होती. त्यावेळचे मावळते अध्यक्ष आर्च क्लम्फ यांनी ती रक्कम जागतिक कल्याणाच्या कार्यासाठी बीज भांडवल (seed capital) म्हणून घोषित केली. त्यातूनच आजचा हा फाउन्डेशनचा महान वृक्ष उभा राहिला आहे. अनेकांनी नंतर यात भर घातली. यामधून काय साधलं हे थोडक्यात सांगायचं तर ' रोटरी फाउन्डेशन' सभासदांकडून मिळालेल्या देणग्यांच्या मार्फत सामाजिक जीवनाची उंची वाढविण्याचे प्रकल्प जगभरात राबविते. स्थापनेपासून आजपर्यंत या कार्यासाठी ४ अब्ज डॉलर्सची मदत करण्यात आलेली आहे. फाउन्डेशनचे ध्येयवाक्य म्हणजे 'आरोग्य सेवा सुधारून, शैक्षणिक क्षेत्रात मदत करून आणि दारिद्र्याचं निवारण करुन अखिल जगतात सामंजस्य, सदिच्छा आणि शांती स्थापन करण्याची संधी रोटरीच्या सभासदांना उपलब्ध करून देणे.'



ज्या प्रकारे फाउन्डेशनचे काम चालते त्यामुळे देणग्यांचा कसा उपयोग होऊ शकतो ते बघा.

- फक्त ०.६ डॉलर्स मध्ये एका बालकाला पोलिओ पासून संरक्षण मिळते.
- ५० डॉलर्स मध्ये शुद्ध पाणी पुरविणे आणि दुषित पाण्याच्या व्याधींपासून मुक्ती देणे हे साधता येते.
- ५०० डॉलर्स खर्च करून लहान मुलांसाठी सुरक्षित वातावरण तयार होऊ शकते.

फाउन्डेशनचे सहाय्य घेऊन प्रत्येक क्लब आपल्या निधीच्या सातपट किमतीचा प्रकल्प करू शकतो, हे आपल्याला माहिती आहेच. यासाठी अनेक प्रकाराने, बाहेरील देशातील क्लब्सशी संपर्क साधून आणि विविध ग्रँट्सचा फायदा घेऊन आपण खूप मोठे काम हाती घेऊ शकतो. सर्व जगातील क्लब्स याचा भरपूर वापर करतात. या माध्यमाद्वारे फाउन्डेशनने २०१८ या एकाच वर्षात ९ कोटी डॉलर्सचा भरघोस निधी उपलब्ध करून दिला होता. डॉलर्समध्ये, ३.५ कोटी रोग निवारणासाठी, २ कोटी शुद्ध पाणी पुरवठ्याच्या योजनांसाठी, १.२ कोटी शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी, १.५ कोटी समाजाच्या आर्थिक परिस्थितीला आधार देण्यसाठी, ७५ लक्ष माता-बालक संगोपनासाठी, आणि ३५.५ लक्ष जागतिक शांतता प्रसारणासाठी, असा एकूण त्याचा आवाका होता.

आपण या महान संघटनेचे सदस्यपद, ज्यासाठी स्वीकारलेले आहे त्या समाजसेवेच्या पूर्ततेसाठी, या फाउन्डेशनच्या कार्याला हातभार लावणे हे आपले कर्तव्य आहे. आपण दिलेली देणगी अनेक पटीने वाढून योग्य त्या कामासाठी उपयोगी पडते हे लक्षात घेण्यासारखे आहे. आणखी एक बाब म्हणजे आपल्या डिस्ट्रिक्ट तर्फे जमा करून फाउन्डेशनला दिलेल्या निधीपैकी ५० टक्के निधी तीन वर्षांनी आपल्याकडे परत येतो आणि आपल्याला विविध प्रकल्पासाठी वापरता येतो. अभिमानाची गोष्ट म्हणजे हा निधी जमविण्यात आपला डिस्ट्रिक्ट भारतात अग्रेसर आहे. दरवर्षी आपली चढती कमानच आहे. आपला सहभाग यात असणे हे आपले कर्तव्य आहे.

फाउन्डेशनला अनेक प्रकारांनी देणगी देता येते. त्यासाठी आपल्याला योग्य त्या प्रकाराने प्रमाणित केले जाते. उदा. PHF (१,००० $), Multiple PHF, Major Donar (१०,००० $), Multiple Major Donar, इ. जो सभासद २.५ लक्ष डॉलर्स इतकी रक्कम फाउन्डेशनला देणगी म्हणून देईल त्याला Arch Klumph Fellow (AKF) म्हणून गौरविण्यात येते आणि त्याचा फोटो रोटरीच्या मुख्य कार्यालयात लावला जातो. देणगी ही फक्त सभासदच देऊ शकतो असे नाही तर रोटरी बाहेरील व्यक्तीही देऊ शकते. तसेच एखादा फंड रेझिंग कार्यक्रम आयोजित करून त्यातून मिळणारी रक्कम ही सुद्धा फाउन्डेशनला देणगी म्हणून देता येते. (काही क्लब्सना बरोबर घेऊन हा एक मेगा प्रोजेक्ट आपण करायला हरकत नाही)

क्लब मधील सर्व सभासदांनी फाउन्डेशनला देणगी द्यावी यासाठी आपण प्रयत्नशील राहू आणि पूर्ण क्लब PHF करण्याचे उद्दिष्ट ठेऊ.

**– रो. सुरेश नातू**

---

(उर्वरित लेख ४ पेजवरून) ***पुण्यातील जोगेश्वरी...***

आहे. सध्या मंदिरा भोवती बिल्डींग झाल्यामुळे मंदिराचे स्थान पटकन लक्षात येत नाही. ही देवी अष्टभुजा महिषासुरमर्दिनीच्या रूपात आहे. पिवळ्या स्फटिकाची मूर्ती असल्याने पिवळी जोगेश्वरी हे नाव पडले आहे. गांधी हत्येनंतरच्या दंगलीत देवीपुढील सिंह जमावाने फोडला होता. लग्न जमावे यासाठी या देवीची भक्ती केली, जाते अशी आख्यायिका आहे. मूळ मंदिर ३०० वर्ष जुने असावे असे म्हंटले जाते.

ह्या तीनही देवळांमध्ये मोठ्या उत्साहात नवरात्र साजरी केली जाते. ९ दिवस देवीला वेगवेगळ्या रंगाची साडी नेसून विविध वाहनांवर बसवले जाते. नऊ दिवस वेगवेगळी आरास मंदिरात केली जाते. या तीन जोगेश्वरी मंदिरांशिवायही पुण्यामध्ये अनेक जुनी आणि महत्वपूर्ण अशी देवींची मंदिरे आहेत. जसे कासारदेवी मंदिर, अष्टभुजा देवी मंदिर, तळजाई, वाघजाई मंदिर, बोलाई देवी मंदिर आणि अनेक. तर ह्या नवरात्री मध्ये जेव्हा देवीच्या दर्शनाला जाल तेव्हा प्रथितयश मंदिरांशिवाय ह्या थोड्या दुर्लक्षित झालेल्या मंदिरांना भेट द्यायला पण विसरू नका.

**संकलन – मधुर बर्वे**

# भेटलेली व्यक्तिमत्वे

२ मे १९८० रोजी मी युनायटेड वेस्टर्न बँकेत नोकरीला लागलो. त्यानंतर डिसेंबर १९८० मध्ये माझी बदली नव्याने स्थापन होणाऱ्या एरंडवणा / गणेशनगर येथे झाली. हा भाग नव्याने Develop होत होता, बऱ्याच सरकारी अधिकारांच्या गृहनिर्माण संस्था या भागात होत्या, येथे नव्याने सर्व नागरिक रहावयास आले होते.

साहजिकच आम्ही या सोसायट्यांमधून बँक स्थापन झाल्याची आणि विविध योजनांचा प्रचार आणि प्रसार करत असू, योजनांना (Scheme) म्हणायची पद्धत होती, त्याचे नामकरण ICICI / HDFC इ. खाजगी बँका बाजारात आल्यानंतर Product असे झाले, त्यांनी Marketing concept बँकांमध्ये आणली. हा भारतीय बँकांमध्ये झालेला पहिला बदल. घरोघर प्रचाराचा उपक्रम रोज असायचा. स. १०.३० ते १२ आणि सायं ७ ते ८.३० पर्यंत अगदी पुणेरी पद्धतीप्रमाणे दुपारची वामकुक्षी घेऊन. बँक सकाळ-संध्याकाळ असे आणि साप्ताहिक सुट्टी सोमवारी असे.

साहजिकच या सरकारी अधिकाऱ्यांची पेन्शन बँकेत जमा होण्यास सुरुवात झाली. हे सर्व अधिकारी ब्रिटिश काळांत साधारण १९३५ ते १९४० च्या सुमारास नोकरीत लागलेले आणि १९८० च्या सुमारास निवृत्त झालेले. त्या सर्वांची वागण्याची एक वेगळीच आदब जाणवायची. प्रत्येकाचे वैशिष्ट म्हणजे अतिशय सुरेख व सुवाच्च हस्ताक्षर, इंग्रजी रनिंग लिपीत असे, परत फाऊंटन पेनच वापरणार, एकदम ताठ उभे, पेहराव सुद्धा पांढरा इस्त्रीचा शर्ट, गडद रंगाची पँट वर पट्टा इ. बँकेच्या दारात 'पेन्शन जमा झाली आहे' असा बोर्ड लागला की पेन्शन काढायला गर्दी करणार.

असेच एक सद्गृहस्थ दर महिन्याला सायकल वरून यायचे, डोक्यावर उन्हाळी टोपी, पोटऱ्यांना स्टीलच्या clips लावलेल्या की ज्यामुळे पँट सायकलच्या चेन मध्ये अडकून खराब होणार नाही.

withdrawl slip अतिशय व्यवस्थित सुवाच्च अक्षरात लिहिलेली असे, मितभाषी, पण चेहऱ्यावर रागाची लकेर जाणवायची. पासबुक घेऊन येणारे, हे गृहस्थ नेहमी आपल्या नावापुढे R. E. E. असे लिहित असतं. आम्हाला नेहमी प्रश्न पडे हे R. E. E. काय आहे? नेहमी आमच्यात चर्चा पण असे. पण विचारणार कोण? एकाने तर कोणती Degree आहे का याचा शोध पण घेतला, पण काही सापडले नाही. आम्ही असे ठरवले की या महिन्यात आले की विचारायचे.

पुढच्या महिन्यात आल्यानंतर मी पेजर नोंद केली आणि पेजर घेऊनच स्वत: साहेबांकडे गेलो. साहेबांनी निरोप दिला त्यांना माझेकडे पाठव. तसे मी सांगितले, जरा साहेबांनी बोलावले आहे, तर म्हणाले सरकारने दिलेली पेन्शन जमा झाली आहे आणि सगळे बरोबर लिहिले आहे, सही बदलण्याची सुतराम शक्यता नाही कारण ती मीच तुमच्या स्टाफ समोर केली आहे. हे ऐकून साहेब स्वत:च Counter जागी आले. जरा घाबरतंच साहेबांनी त्या खातेदाराला म्हणाले ''आम्हाला एक औत्सुक्य आहे, आम्ही शोधलं पण मिळालं नाही आणि इतरांना विचारलं तर ते पण सांगू शकले नाही. नावानंतर हे R.E.E. काय लिहिता? ही कोणती पदवी वगैरे आहे का?''

तर एकदम हसायला लागले आणि म्हणाले, ''ती माझी पोस्ट आहे, हुद्दा. Retired Executive Engineer'' आम्ही सगळेच मोठ्याने हसायला लागलो. हया प्रसंगानंतर मात्र हा रागीट दिसणारा माणूस आमचा प्रतिष्ठीत खातेदार झाला, आमचे मित्रत्वाचे नाते सुरु झाले.

त्या काळात 'देहदानाची' कल्पना फारच नवीन होती, अशी 'अवयवदाना'ची सध्या आहे. देहदानाचा प्रसार आणि प्रचार फार झाला नव्हता, नागरिकांच्या या बाबतीत फार वेगवेगळ्या कल्पना होत्या काहीतर फार टोकाच्या होत्या. या R. E. E. गृहस्थांनी सायकलवर फिरून त्याचा प्रचार केला. त्यांनी अनेक कार्यालयांमधून, ज्येष्ठ नागरिक संघामधून देहदान या विषयावर व्याख्याने आयोजित केली, एखाद्याच्या घरी जाऊन फॉर्म्स भरून घेतले, त्यासाठी त्यांनी संकल्प केला होता आणि तो पूर्ण झाला तेव्हा त्यांचा सत्कार पण करण्यात आला होता.

''माणूस दिसतो तसा तो प्रत्यक्षात नसतो, तेव्हा एखाद्या व्यक्तीविषयी ओळख व्हायच्या आधी मतं ठरवणे चुकीचे ठरते.''

माझ्या नोकरीच्या सुरुवातीच्या काळात ओळख झालेले आणि लक्षात राहिलेले हे पहिले गृहस्थ.

**– रो. सूर्यकांत वझे.**

## * आगामी कार्यक्रम *

**९ आक्टोबर....**
काही नवीन आणि जुन्या मेंबर्सची ओळख

**१६ आक्टोबर....**
रवी बोरावके यांचे वेरुळ येथील लेण्यांविषयी व्याख्यान

**२३ आक्टोबर...**
कल्चरल कमिटी प्रोग्रम

**३० आक्टोबर....**
बिझनेस मिटींग



## ‘महादान’

# ‘महादान’ क्लबचा वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प



गेली सहा वर्षे आमचा क्लब ‘महादान’ हा सर्वार्थाने आगळा वेगळा प्रकल्प राबवत आहे. हा प्रकल्प करण्यामागे आमचे अनेक उद्देश होते. एकतर मदत जमा होतेच, पण त्याबरोबरच रोटरीचे कार्य हे या निमित्ताने दान करायला येणाऱ्या मंडळींपर्यंत पोचविणे आणि त्यांच्याही मनात सामाजिक कार्याची जाण निर्माण करणे.

परंतू या वर्षी कोरोना महामारीमुळे हा प्रकल्प आपण करू शकू की नाही, याची सतत मनात धाकधूक होती. परंतू आमच्या कमिटी मेंबर्सच्या मिटींगमधून एक वेगळीच कल्पना समोर आली आणि अधिक महिन्यातील दानाचं महत्त्व लक्षात घेऊन आम्ही स्वत:च सर्व लोकांपर्यंत पोचण्याचा निर्णय घेतला.

आम्ही प्रथमत: क्लब मध्ये आवाहन केले, लगेचच सर्व मित्रांनी १ टन धान्य उभे केले सुद्धा. त्यानंतर आपण ज्या सोसायटीत राहतो किंवा आपले आप्तेष्ट जिथे असतील तेथून कसे संकलन करता येईल याचा विचार मांडला गेला. त्यालाही लगेच दुजोरा मिळाला.

प्रत्येकाने आपण राहत असलेल्या सोसायटीत, मित्रमंडळी मध्ये, नातेवाईकांना आवाहन केले, ‘ज्याला जसे शक्य होईल म्हणजेच यथाशक्ती जे दान देऊ इच्छितो ते आम्ही ह्या अधिक महिन्यात आपणाकडे येऊन घेऊन जाऊ. १८ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर ह्या कालावधीत आपण हे सर्व एकत्र जमवू. आम्हाला फोन केलात तर आम्ही आपणाकडून हे दान स्वीकारण्यासाठी नक्की येऊ अर्थात मास्क, सॅनिटायझेशन, सोशल डिस्टन्सिंगचे सर्व नियम पाळूनच.’

सांगायला आनंद आणि अभिमान वाटतो की, मित्रांनो खूप चांगला प्रतिसाद मिळतोय. याला महत्त्वाचे कारण म्हणजे प्रत्येकाला इच्छा असते, पण आपण देणार असलेले सर्व धान्य, कपडे व रोख रक्कम ही खऱ्या गरजू पर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी कोणाची? म्हणजेच आपले दान सत्पात्री पडावे, असे प्रत्येकाला वाटते. तो विश्वास रोटरीवर नक्कीच सर्वांचा आहे.

याला सुरुवात आमच्या सन-ऑरबीट सोसायटी मध्ये रविवार दि. २० सप्टेंबर रोजी झाली. इथे महादान प्रोजेक्ट मध्ये जमा झालेले दान:- ३६० किलो धान्य, ३६ बॅग्ज कपडे, ३ बॅग्ज खेळणी आणि इतर वस्तू, १ व्हीलचेअर, ५००० रोख रक्कम. विशेष उल्लेख करायचा म्हणजे ह्या सर्वात गेटवरील सिक्युरिटी गार्डची मदत तर होतीच पण त्यांनी ५ किलो धान्य देऊन सर्वांचेच लक्ष वेधून घेतले.

सर्व रोटेरियन मित्र आणि सन ऑरबीट मधील रहिवाशी तसेच अधिक महिन्याच्या महात्म्याने आपल्या क्लबच्या सिग्नेचर प्रोजेक्ट महादानाला जबरदस्त सुरवात झाली. सध्याच्या

**रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेज ‘महादान’ सामाजिक उपक्रम राबवितांना पदाधिकारी व सढळ हस्ते दान करणारे नागरिक**



परिस्थितीला अनुसरून नेहमीच्या पेक्षा थोडे स्वरूप बदलून हा प्रोजेक्ट सुरू करायचा ठरलं तेव्हा खर तर जरा धाकधूक वाटत होती. परंतु हा प्रतिसाद पाहता आपण उचलेले पाऊल योग्य दिशेने आहे ह्याची खात्री झाली.

रोटेरियन शशांक व दीपा बारटक्के यांच्या गजानन सोसायटीत कोथरूड येथे महादान २७ तारखेला घेतले व इथे देखील सुंदर असा प्रतिसाद मिळाला अगदी इस्त्रीवाला सुद्धा दान देऊन गेला. तसेच याच दिवशी रोटेरियन अविनाश व सुनीता ओगले यांनी स्वत:च्या सोसायटीत धान्य व रोख रक्कम गोळा केली. तसेच कम्युनिटी डायरेक्टर संगीता काकडे यांच्या सोसायटीतून धान्य दिले असे जवळ जवळ तीन सोसायटीतून ३५० किलो धान्य, २४,३५२/- रोख रक्कम तसेच ५५ बॅग कपडे जमा झाले.

२७ तारखेलाच संध्याकाळी रोटेरियन लीनाताईंची मैत्रिण मीनल सोनपत्की यांच्या 'झाला कॉम्प्लेक्स' ह्या सोसायटीत २२८ किलो धान्य, ११ बॅग कपडे एव्हढे कलेक्शन झाले.

सर्वचजण इतके छान आनंदाने मदत करत असतात की आम्हा कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित होतो. सर्वांचा हिरीरीने सहभाग कामातली ऊर्जा वाढवतो. त्यामुळे हे काम, काम न वाटता आनंदोत्सव वाटतो. पुढल्या सोसायटी मध्ये कधी जातोय आणि हे महादान मिळवून सेवाभावी संस्थेला देतोय याची आम्ही वाट पाहत असतो.

या सर्व सोसायट्यातून जमा झालेले, धान्य, कपडे आणि आर्थिक दान हे आम्ही खालील सामाजिक संस्थांना दिले आणि देणारही आहोत.

**१) रोस्ट्रम इंडिया सोशल ऑर्गनायझेशन** - ही एक सेवाभावी संस्था असून - संस्थेचे महाराष्ट्रात आणि बाहेरही भरपूर कार्य आहे. २०१३ साली रितसर नोंदणी झाली असली तरी संस्थेचे बीज २००५ मध्येच रोवले गेले होते. समाजासाठी काहीतरी करायच्या प्रखर भावनेने प्रेरित होऊन दुर्लक्षित घटकांसाठी संस्था प्रामुख्याने काम करते. ऊस तोडणी कामगार, वेश्यांची मुले, यांच्यासाठी संस्था काम करते.

**२) ध्रुव फाउंडेशन** - ध्रुव फाउंडेशन भोर तालुक्यातील टिटेघर येथील वंचित, बेघर, निराधार तसेच बालकामगार, मुलांसाठी काम करणारी संस्था. अध्यक्ष राजीव केळकर.

वंचित मुलांसाठी शालेय व व्यावसायिक शिक्षण, वाचनालय, अन्न धान्य व वस्त्र पुरवठा, वृक्षारोपण व इतर पर्यावरणपूरक प्रोजेक्ट्स, दुर्गम भागातील जमातींना अन्नधान्य व वस्त्र पुरवठा इ. प्रकारचे काम केले जाते.

सध्याच्या कोविड काळात परराज्यातील मजूर कुटुंबांचे पुनर्वसन, त्यांना पत्र्याची घरे बांधून दिली, अन्नधान्य, कपडे व जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून दिल्या.

भोरच्या आसपासच्या ९० गावांमध्ये ज्या घरात कमावते कोणी नाही अशा अतिशय गरीब ८०० कुटुंबात अतिशय पारदर्शकपणे किराणा सामान किट वाटप ध्रुव फाउंडेशन तर्फे होणार आहे.

**३) स्नेहालय** - नावाप्रमाणेच, स्नेह, माया भरभरून देणारी ही संस्था. १९८९ साली या संस्थेची गिरीश कुलकर्णी यांनी अहमदनगरमध्ये स्थापना केली. समाजामध्ये लहान मुलं, स्त्रिया यांना मिळणारा, दुजाभाव, विषमता, क्रौर्याने पिडीत, स्त्रिया, मुलं यांच्यासाठी ही संस्था काम करते.

HIV, AIDs यांनी बाधित लहानमुलं, स्त्रिया, लैंगिक शोषणाला, अवैध गोष्टी जबरदस्तीने कराव्या लागणाऱ्या व्यक्तिंसाठी हि संस्था प्रामुख्याने काम करते.

**४) मातोश्री वृद्धाश्रम** - सर्वांनाच परिचित असलेला हा गेली अनेक वर्षे राजाराम पुलाजवळ असलेला वृद्धाश्रम. राजा शिवराय प्रतिष्ठानतर्फे हा चालवला जातो. मा. शशिकांत सुतार हे या आश्रमाचे आधारस्तंभ. शंभराहून अधिक वृद्ध हे इथे सेवा घेतात. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे अत्यंत अल्प किंबहुना मोफत पद्धतीनेच हा वृद्धाश्रम चालवला जातो.

**५) जनकल्याण समिती** - राष्ट्रीय स्वातंत्र्य संघ - यांची जनकल्याण समिती ही सेवाभावी शाखा. नवनवीन अचानक येणाऱ्या अडचणींसाठी धावून जाणारी संस्था. यावेळी कोरोनासारख्या वैश्विक महामारीसाठी पाय रोवून उभी राहिली आहे आणि लाखो लोकांना, सर्व प्रकारे सहकार्य करत आहे. अगदी स्वयंसेवकांपासून - ते डबे पोचविणेपर्यंत - सर्व प्रकारचे कार्य करते.

एकंदरीत हा प्रोजेक्ट आता खूप चांगले स्वरूप घेत आहे आणि अजूनही १५ दिवस पुढे चालणार आहे. त्यामुळे मित्रांनो, आपल्या सोसायटीत किंवा ओळखीत देखील हा प्रोजेक्ट आपण घेऊ शकता. आपणास काही शंका असतील तर फोन करून नक्की विचारा.

प्रोजेक्टला उपस्थित सर्व सदस्यांचे खूप खूप आभार.

**-रो. सचिन हणमघर.**



# रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेज
## अधिक मासानिमित्त
# महादान

